नि० ५६

—क्र. १—

सरतपास शपथपत्र वादीर्फे
दा०दि० १५/१०/२०१६

रे.मु.नं. २९/२०१३

# देवगड येथील मे. दिवाणी न्यायाधीश यांचे कोर्टात

विलास सहदेव परब — वादी

विरुद्ध

महेंद्र सहदेव परब (वगैरे ८) — प्रतिवादी

## सरतपासाचे शपथपत्र

मी वादी श्री. विलास सहदेव परब वय सु.५८वर्षे, धंदा—शेती, राहणार — मौजे वाडा (परबवाडी), तहसिल देवगड, जि. सिंधुदुर्ग, सत्यप्रतिज्ञापूर्वक सरतपासाचे शपथपत्र करतो ते पुढीलप्रमाणे —

१) जिल्हा व रजिस्टर तुकडी सिंधुदुर्ग पैकी पोटतुकडी व तहसिल देवगड पैकी महसुली गाव मौजे जामसंडे येथील शिवनंदन कॉम्पलेक्स या ईमारतीमधील ग्रामपंचायत घर नंबर ११८१ या क्रमाकांची दुसऱ्या मजल्यावरील, ५७८ चौ.फुटाची सदनिका हा दावा विषय आहे.

२) माझे प्रतिवादी क्र. १ ते ६ हे सख्खे बंधु असून प्रतिवादी क्र. ७, ८ व ९ या माझ्या सख्ख्या बहीणी आहेत. मी माझ्या सख्ख्या भावासोबत म्हणजेच प्रतिवादी क्र. ४ बरोबर गावी राहतो व तो कुटुंबाच्या मालमत्तेचा सांभाळ करतो. माझे अन्य बंधूंपैकी, प्रतिवादी क्र. १ हा व्यवसायाने रिक्षाचालक असून तो देवगड येथे रिक्षा व्यवसाय करतो. प्रतिवादी क्र. २, ३ व ५ हे माझे अन्य तीन सख्खे बंधू मुंबई येथे नोकरीधंदयानिमित्त वास्तव्यास असतात. तसेच माझ्या सख्ख्या बहीणींपैकी प्रतिवादी क्र. ६ व ७ यांची लग्ने झाली असून त्या आपआपल्या सासरी नांदावयास असतात.

प्रतिवादी क्र. ८ ही जन्मतःच मतिमंद असून तिला काहीही व्यावहारिक ज्ञान नाही तसेच जन्मापासूनचे मतिमंदत्वामुळे तिचे काहीही शिक्षणही झालेले नाही. ती स्वतःचे पालनपोषण करण्यास संपूर्णपणे असमर्थ असून तिचे इतर हितरक्षण व दैनंदिन पालनपोषण तिचे बंधू श्री.अनिल सहदेव परब (प्रतिवादी क्र. ४) हेच करत आहेत.

३) माझे व प्रतिवादींचे वडील कै.सहदेव रावजी परब हे तारीख २१/१०/२०११ रोजी गाव मौजे वाडा येथे मयत झाले. मृत्यूचेवेळी कै. सहदेव यांचे वय सुमारे ८१वर्षे एवढे होते. कै.सहदेव यांना त्यांचे मृत्यूसमयी मोठया प्रमाणात मधुमेह तसेच रक्तदाब यासारखे विकार जडलेले होते. मृत्यूपूर्वी काही दिवस कै.सहदेव हे खाजगी रुग्णालयात

0
R&R
15/10/16
CJ-JD.

Received
Asstt. Supdt
Civil Court, Devgad

विलयक रद.

Civil Co

उपचारांसाठी दाखल झाले होते. मानसिकदृष्टयाही ते त्यावेळी सदृढ नव्हते. मृत्युपूर्वी कित्येक दिवस ते सतत आजारी होते.

माझे व प्रतिवादीचे वडील कै.सहदेव रावजी परब हे पोलीस दलातून त्यांचे मृत्यूपूर्वी कित्येक वर्ष अगोदर निवृत्त होवून आपले कुटुंबासह गावी म्हणजेच मौजे वाडा (परबवाडी), तहसिल देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील त्यांचे वडीलोपार्जित घरी रहात असत आणि कुटुंबाच्या शेतीकडे व बागायतीकडे लक्ष देत असत. माझे व प्रतिवादींचे कुटुंबाची सुमारे ५५० ते ६०० कलमांची आंबा बाग असून दरसाल काही लाखांचे उत्पन्न ती बाग देते. ते उत्पन्न माझे व प्रतिवादीचे वडील कै.सहदेव हे त्यावेळी कुटुंबकर्ते असल्याने सहाजिकच त्यांचे हाती जात होते व त्या उत्पन्नातूनच त्यांनी दावा विषय असलेली सदनिका खरेदी करण्याचा व्यवहार ठरविलेला होता व सदनिकेचा मोबदला दिला होता. त्यामुळे सदरची सदनिका कै.सहदेव आणि माझी व प्रतिवादींचे कुटुंबाची समाईक मिळकत ठरते व तशी ती आहे.

४) मृत्युपूर्वी काही महिने कै.सहदेव देवगड येथे दावा विषय असलेल्या सदनिकेमध्ये रहात होते कारण त्यांना सतत वैद्यकीय उपचारांची गरज होती. तथापि गाव मौजे वाडा येथे त्यासाठी आवश्यक वैद्यकीय सोयीसुविधा उपलब्ध नसल्याने त्यांनी देवगड येथे रहाणे पसंत केले होते. शिवाय गावचे मिळकतींकडे पूर्वीसारखे लक्ष देणे त्यांना प्रकृतीमुळे जमत नव्हते. सबब कै. सहदेव यांनी गावाकडील मिळकतींची जबाबदारी माझेकडे व प्रतिवादी क्र. ४ कडे सोपवून देवगड येथील दावा विषय असलेल्या सदनिकेमध्ये मृत्यूपूर्वी काही दिवस राहणे पसंत केले होते. कै.सहदेव हे देवगड येथे स्वत:सोबत त्यांची मतिमंद मुलगी (प्र.वा.८) व माझे बंधु श्री.महेंद्र, (प्रतिवादी क्र.१) यांना बरोबर घेवून रहात असत. प्रतिवादी क्र. १ श्री.महेंद्र हे देवगड येथे रिक्षाव्यवसाय करत होते त्यामुळे प्रतिवादी क्र. १ त्याच्या सोयीच्या दृष्टीने कै.सहदेव यांचेसोबत देवगड येथे रहात असत. श्री.महेंद्र यांची पत्नी व मुले सुध्दा कै.सहदेव व प्रतिवादी क्र. १ यांचेबरोबर दावा विषय असलेल्या सदनिकेमध्येच रहात असत.

५) वरीलप्रमाणे परिस्थिती असता माझे व प्रतिवादींचे वडील कै.सहदेव यांनी दावा मिळकतीबाबत दिनांक १८/०२/२०११ रोजी, दावा मिळकत खरेदी घेण्यासाठी इमारत बांधणारे विकासक व कंत्राटदार, यांचेबरोबर रजिस्टर्ड साठेखत केले. त्यानंतर कै.सहदेव यांनी सदनिकेची किंमत रुपये ४,४०,०००/— (रुपये चार लाख चाळीस हजार मात्र) हीसुध्दा विकासकांना त्यांनी पोच केली होती. कुटुंबकर्ते म्हणून माझ्या व प्रतिवादींच्या कुटुंबाच्या वडीलोपार्जित समाईक मिळकतीचे व बागायतीचे उत्पन्नातूनच त्यांनी सदरची मिळकत खरेदी केली होती. त्यामुळे दावा मिळकत माझी व प्रतिवादींची समाईक मिळकत ठरते. सबब दावा विषय असलेल्या सदनिकेत मी व प्रतिवादी १ ते ८ या सर्वांपैकी प्रत्येकाचा १/९ हिस्सा आहे.

६) माझ्या व प्रतिवादी १ ते ८ च्या संमत्तीनेच कै.सहदेव यांनी दावा विषय असलेल्या सदनिकेबाबत असा व्यवहार ठरविलेला होता. ठरलेल्या व्यवहराप्रमाणे रजिस्टर्ड खरेदीखत पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी पार पाडण्यास आपला देवगड येथे राहणारा बंधू, प्रतिवादी क्र. १ महेंद्र हा आपले वडीलांना मदत करेल अशी आशा मला व अन्य प्रतिवादींनी केली होती व तसे आम्ही प्रतिवादी क्र.१ला सांगितले देखील होते. प्रतिवादी १ने ही आपण आपल्या वडीलांना हरप्रकारे रजिस्टर्ड खरेदीखत करण्यास मदत करु असे वचन दिले होते.

विलास रत्न.

As
Civil Cou

७) कै.सहदेव व मी व प्रतिवादी क्र. १ ते ८ यांनी एकमताने ठरविल्याप्रमाणे दावा विषय असलेल्या सदनिकेचे रजिस्टर्ड खरेदीखत माहे ऑक्टोबर २०११ मध्ये करुन घेतले गेले. त्यावेळी कै.सहदेव यांचेबरोबर प्रतिवादी क्र. १ हाच दुय्यम निबंधक कार्यालयात हजर होता व त्याने दिनांक १५/१०/२०११ रोजी कै.सहदेव यांचेबरोबर हजर राहून दावा मिळकतीचे खरेदीखत इमारत विकासक यांचेकडून करुन घेवून रजिस्टर्ड केले.

परंतु एवढयावरच प्रतिवादी क्र. १ हा थांबला नाही. त्याने दावा विषय असलेली सदनिका एकटयानेच लाटण्याचे दृष्टीने कै.सहदेव यांचे नावचा एक रजिस्टर्ड मृत्यूपत्राचा लेखही त्याचदिवशी रजिस्टर्ड करुन घेतला. कै.सहदेव यांना त्याची पूर्ण जाणीव न देता व त्यांची फसवणूक करुन सदरचा तथाकथित मृत्यूपत्राचा लेख प्रतिवादी क्र. १ ने तयार करुन घेतला आहे आणि तो खरेदीखताचे नोंदणीचे वेळीच नोंदवूनही घेतला आहे हे स्पष्ट दिसते. आता सदरच्या तथाकथित मृत्यूपत्राच्या आधारे तो सदरची सदनिका आपले एकटयाचेच मालकीची झाल्याचा कांगावाही करत आहे. आणि माझे व अन्य प्रतिवादींचे सदर सदनिकेमधील हक्कसंबंध नाकबूल करुन डावलू पाहत आहे. इतकेच नव्हे तर प्रतिवादी क्र. १ ने कै.सहदेव यांचे मृत्यूपश्चात दावा मिळकत असलेली सदनिका वरील तथाकथित मृत्यूपत्राचा वापर करत ग्रामपंचायत दप्तरी स्वत:चे नावे करुन घेतली आहे. प्रतिवादी १ ने दावा मिळकत स्वत:चे नावे करण्यापूर्वी मला व प्रतिवादी २ ते ८ यांना कोणतीही पूर्वकल्पना दिलेली नव्हती व नाही. किंबहुना कै.सहदेव यांचेसोबत सदर सदनिकेत रहात असणाऱ्या मझ्या व प्रतिवादींच्या मतिमंद बहीणीला म्हणजेच प्रतिवादी क्र. ८ ला कै.सहदेव यांचे मृत्यूपश्चात अवघ्या काही दिवसात प्रतिवादी १ने दावा मिळकतीमधून बाहेर काढले व तिला गाव मौजे वाडा येथे आणून माझे व प्रतिवादी ४ चे ताब्यात दिले.

८) माझे व प्रतिवादींचे वडील कै.सहदेव यांचे वर उल्लेखलेले दिनांक १५/१०/२०११ रोजी नोंदविलेले तथाकथित मृत्यूपत्र हे देवगड येथील दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त क्रमांक १२५१/२०११ या क्रमांकाने नोंदले गेलेले आहे. सदरचे मृत्यूपत्रातील मजकूर धादांत खोटा आहे. ते कै.सहदेव यांनी स्वत: पूर्ण जाणीवेने व राजीखुशीने केलेले मृत्यूपत्र असणे संभवतच नाही. तसेच मृत्यूपत्रावर करण्यात आलेली सही आणि अंगठयाची निशाणीसुध्दा कै.सहदेव यांची असणे संभवत नाही किंवा कै. सहदेव यांच्या त्यावेळेस शारिरीक व मानसिक दौर्बल्याचा गैरफायदा घेवून व कै.सहदेव यांची फसवणूक करुन त्यांचेकडून सदरचे तथाकथित मृत्यूपत्र प्रतिवादी क्र. १ ने करुन घेतले आहे. प्रतिवादी १ने कै.सहदेव यांना ते एका मृत्यूपत्राचे लेखावर त्यांची सही व अंगठा उठवत आहोत याची जाणीवही होवू दिली नव्हती. अन्यथा त्यांना एकाच दिवशी व एकाच वेळी एकाच मिळकतीबद्दल आपले स्वत:चे नावे एका रजिस्टर्ड खरेदीखताने दावा मिळकत खरेदी घेण्याची आणि लगेच ती आपल्या ९ मुलांपैकी एकालाच एका रजिस्टर्ड मृत्यूपत्राने देवून टाकण्याची काहीच आवश्यकता नव्हती. इतकेच नव्हे तर आपले कुटुंबिय मुलांमुलींमध्ये प्रतिवादी क्र. १ बद्दल विशेष प्रेम कै. सहदेव यांना असण्याचेही काहीच कारण नव्हते. तसेच आपले मृत्यूपत्रात आपल्या मतिमंद मुलीबद्दल, म्हणजे प्रतिवादी ८ बद्दल, काहीच तरतूद करुन न ठेवण्याचे त्यांना कारण नव्हते. सदरचे तथाकथित मृत्यूपत्रात नमूद असलेल्या अन्याय्य व भेदभाव करणाऱ्या मजकूरावरुनच सदरचे तथाकथित मृत्यूपत्र हे संपूर्णपणे बनावट अगर कै.सहदेव यांची फसवणूक करुन घेतले असल्याची शक्यता दृढ होते. मृत्यूपूर्वी काही दिवस कै.सहदेव यांना मानसिक व शारिरीक दौर्बल्य प्राप्त झालेले होते. ते अत्यंत वयोवृध्द व अशक्त होते. त्यांना सतत वैद्यकीय उपचार घ्यावे लागत होते. ते दावा मिळकतीत प्रतिवादी क्र. १ बरोबरच रहात असल्याने व प्रतिवादी क्र १ व त्याचे कुटुंबावर अवलंबून असल्याने, ते सतत प्रतिवादी क्र.

विलास रवे-

Civil Cou

सतत प्रतिवादी क्र. १ च्या दबावाखाली रहात असत. याचाच गैरफायदा घेवून कै.सहदेव यांचेवर अनुचित प्रभाव पाडून सदरचे तथाकथित मृत्यूपत्र प्रतिवादी क्र. १ याने तयार करुन घेतले असल्याची शक्यता ही नाकारता येत नाही. इतकेच नव्हेतर प्रतिवादी क्र. १ने सदर मृत्यूपत्रावर कै.सहदेव यांच्या अपरोक्ष साक्षीदारांच्या सहया घेतल्या असाव्यात ही देखील शक्यता नाकारता येत नाही.

जी मिळकत कै.सहदेव यांची एकटयाचीच स्वसंपादीत कधीच नव्हती व नाही, त्याबद्दल असे तथाकथित मृत्यूपत्र कै.सहदेव यांनी, पूर्ण जाणीवेने व राजीखुशीने केले असण्याची शक्यता अजिबातच संभवत नाही.

दिनांक १५/१०/२०११ रोजी दावा मिळकतीचे खरेदीखत व मृत्यूपत्र नोंदणीकृत करुन घेण्यात आली आहेत. त्यावेळेस कै.सहदेव यांची प्रकृती ढासळलेली होती. व त्यानंतर अवघ्या ७ दिवसात म्हणजेच दिनांक २१/१०/२०११ रोजी कै.सहदेव हे मौजे वाडा, तहसिल देवगड, जि.सिंधुदुर्ग येथे आपले मूळ घरात मयत झाले. कै.सहदेव यांची पत्नी, तीच माझी व प्रतिवादींची आई, कै.सहदेव यांच्या पूर्वी मयत झाली होती.

९) मी व प्रतिवादी २ ते ७ यांनी प्रतिवादी क्र. १ ला सामोपचाराने दावा मिळकतीमधील त्यांचा हिस्सा देण्याची विनंती केली असता प्रतिवादी क्र. १ने दावा मिळकतीचे वाटप करुन देण्यास माहे डिसेंबर २०१२ मध्ये अंतिम नकार दिला. सबब दावा मिळकतीमधील माझा व प्रतिवादी २ ते ८ चा कायदेशीर हिस्सा स्वतंत्र करुन घेवून त्याचा पृथक कब्जा मिळविण्यासाठी मला हा दावा या मे. कोर्टात दाखल करावा लागत आहे.

१०) वरील एकंदर परिस्थितीत सदरचे दिनांक १५/१०/२०११ रोजी नोंदलेले दस्त क्रमांक १२५१/२०११ चे रजिस्टर्ड मृत्यूपत्र हे पूर्णपणे बेकायदेशीर व रद्दबातल असल्याचा ठराव व्हावा आणि दावा मिळकतीचे माझेत व प्रतिवादींच्यात वाटप करण्यात येवून माझ्या व प्रतिवादी २ ते ८ च्या एकत्रातील ८/९ हिश्श्याचे वाटप करण्यात येवून त्याचा पृथक कब्जा देण्याचा आदेश व्हावा. माझा व प्रतिवादी क्र. २ ते ८ चा मिळून दावा मिळकतीमध्ये ८/९ हिस्सा आहे. त्यांचा तुर्त एकत्रात पृथक कब्जा देण्याचा आदेश व्हावा अगर यापैकी कोणास आवश्यकता वाटल्यास त्याने आपला १/९ भाग स्वतंत्र करुन घेण्याचाही आदेश व्हावा. प्रतिवादी क्र. ८ चे भविष्यातील वास्तव्याचे दृष्टीनेही अशी व्यवस्था असण्यास माझी व प्रतिवादी क्र. २ ते ७ ची संमत्ती आहे. प्रतिवादी क्र. २ ते ८ आज हजर नसल्यामुळे त्यांना सामील प्रतिवादी केले आहे. मिळकतीचे स्वरुप पाहता सदरच्या सदनिकेचे वाटपाने फारच छोटे भाग होवू नयेत यासाठी जरुर तर पार्टीशन ॲक्टचा अंमल करण्याचाही आदेश व्हावा व तसा स्पष्ट निर्देश करणारा प्राथमिक हुकूमनामा करण्यात यावा आणि त्यानंतर अंतिम हुकूमनामा करण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

११) प्रतिवादी क्र. १ ने त्याचे कैफियतीमध्ये परिच्छेद ३ मध्ये दिलेला मजकूर *"कै.सहदेव हे हयात असेपर्यत प्रतिवादी क्र. ८ ची देखभाल प्रतिवादी क्र.१ यांची पत्नी सौ.मृणाल हीच करत होती व आजअखेर तिची देखभाल दावामिळकतीमध्ये राहून सौ.मृणाल हीच करत आहे. तिचे पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी ही प्रतिवादी क्र. ४ यांनी कधीही पार पाडलेली नाही. वादी व प्रतिवादी क्र. ४ सोडून इतर प्रतिवादी हे परब कुटुंबाच्या एकत्रातील मिळकतीमधील उत्पन्न व प्रतिवादी क्र. ८ हीचा हिस्सा वगळू पाहत असल्यानेच वादी याने जाणीवपूर्वक प्रतिवादी क्र. ४ यांची नेमणूक प्रतिवादी क्र. ७ हीचा पालनकर्ता म्हणून करणेसाठी अर्ज दिलेला आहे. सदरचा अर्ज खोटा व*

Civil Cou

खोडसाळ असून त्यातील सर्व मजकूर प्रतिवादी क्र. १ यांस मान्य व कबूल नाही." हा सर्व मजकूर धादांत खोटा व चुकीचा असून तो मला मान्य नाही.

१२) प्रतिवादी क्र. १ ने त्याचे कैफियतीमध्ये परिच्छेद ४ मध्ये दिलेला मजकूर "कै.सहदेव यांच्या गाव मौजे वाडा व नाडण येथे वडीलोपार्जित व काही खरेदी केलेल्या मिळकती असून सदरहू मिळकतीचे खाते वर्णन हे खाली नमूद केलेप्रमाणे आहे. खाते क्र. ३५६, १२९०, १२८५, १२८४, १२७७, १२७४, १२६६, १२६१, १२५९, १२४८, ११९५, २९५, ११६६ मधील मिळकती या मौल्यवान अशा असून सदरहू मिळकतीमध्ये आंबा कलमे, काजू कलमे, माड, फणस, साग, रतांबे इ. झाडे असून कै.सहदेव हे हयात असेपर्यंत सदरहू मिळकतींचे उत्पन्न हे एकत्रात कुटुंबाच्यावतीने हे तेच घेत होते व हिस्सेदारांच्या गरजेप्रमाणे त्याचा विनियोग करत होते. सदरहू मिळकती व्यतिरिक्त कै. सहदेव यांनी आपल्या हयातीत त्यांचे नावे खरेदी केलेली व आजअखेर प्रतिवादी क्र. ५ यांच्या नावाने लवकुश अपार्टमेंट विरार जि.ठाणे येथे असलेली रुम नं. ३० हा इमला कै.सहदेव यांनी आपल्या हयातीत कुटुंबाच्या उत्पन्नातून समाईकात खरेदी केलेला होता. त्यामुळे या सर्व मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. ८ हीचा हक्क व अधिकार इतर वादी व प्रतिवादी यांचे समवेत असून सदरहू मिळकत ही या दाव्याचे कामी सामील केलेशिवाय वादीचा दावा कायद्याने चालण्याजोगा नाही." हा सर्व मजकूर धादांत खोटा व चुकीचा असून तो मला मान्य नाही.

१३) प्रतिवादी क्र. १ ने त्याचे कैफियतीमध्ये परिच्छेद ६ मध्ये दिलेला मजकूर "दावामिळकत ही जरी कै.सहदेव यांनी आपल्या हयातीत खरेदी केलेली मिळकत असली तरी सदरहू मिळकत कै.सहदेव यांनी प्रतिवादी क्र.१ यांचे कुटुंबाकरिता ते त्यांची काळजी घेऊन त्यांच्या गरजांची पूर्तता करतात या कारणास्तव व प्रेमापोटी मृत्यूपत्राद्वारे प्रतिवादी क्र. १ यांस दिलेली मिळकत आहे. त्यामुळे त्यामध्ये वादी व इतर प्रतिवादी यांना कोणताही हक्क मिळण्याजोगा नाही. दावामिळकत ही कधीही वादी, प्रतिवादी यांची समाईक मिळकत नव्हती व नाही. कै.सहदेव याना सतत वैद्यकीय उपचारांची गरज लागलेली नव्हती. ते केवळ प्रेमापोटी प्रतिवादी क्र. १ यांचे समवेत प्रतिवादी क्र. ८ हीला घेऊन राहत होते. कै. सहदेव यांनी गावाकडील मिळकतीची जबाबदारी वादी व प्रतिवादी क्र. ४ यांचेवर कधीही सोपविलेली नव्हती व नाही. याचेकारण म्हणजे वादी व प्रतिवादी क्र. ४ यांनी दावामिळकतीचे अवमूल्यन होईल अशीच कृत्ये केलेली होती व आहेत." हा सर्व मजकूर धादांत खोटा व चुकीचा असून तो मला मान्य नाही.

१४) प्रतिवादी क्र. १ ने त्याचे कैफियतीमध्ये परिच्छेद ७ मध्ये दिलेला मजकूर "दावामिळकत खरेदीचे वेळी विकासक व कंत्राटदार यांना कै.सहदेव यांनी रक्कम पोच केलेली असली तरी दावामिळकत ही कै.सहदेव यांनी प्रतिवादी क्र. १ करिताच खरेदी केलेली असल्यामुळे व योग्य त्या मृत्यूपत्राद्वारे प्रतिवादी क्र. १ यांस मालकीहक्काने उपभोगण्यास दिलेली असल्यामुळे वादी व उर्वरीत प्रतिवादी यांस कोणताही हक्क मिळण्याजोगा नाही." हा सर्व मजकूर धादांत खोटा व चुकीचा असून तो मला मान्य नाही.

१५) प्रतिवादी क्र. १ ने त्याचे कैफियतीमध्ये परिच्छेद ८ मध्ये दिलेला मजकूर "दावामिळकत ही कै. सहदेव यांनी केवळ प्रतिवादी क्र. १ यांचे कुटुंबाकरिता खरेदी केलेली असल्यामुळे सदरहू मिळकतीबाबत वादी व इतर प्रतिवादी यांनी हस्तक्षेप करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे त्यांनी कोणतीही जबाबदारी प्रतिवादी क्र. १ यांस देणेचा प्रश्न उद्‌भवलेला नाही. प्रतिवादी क्र. १ यांनी कै.सहदेव यांची कोणतीही फसवणूक करुन कोणताही मृत्यूलेख केलेला नसून कै.सहदेव यांनी आपल्या पूर्ण जाणीवेने प्रतिवादी क्र. १ यांस मृत्यूपत्राने दावामिळकत मालकी हक्काने उपभोगण्यास दिलेली आहे. व त्यानुसारच आज अखेर दावामिळकतीच्या घरपत्रक उताऱ्यासदरी प्रतिवादी क्र. १ यांचे नाव मालक म्हणून नोंद झालेले आहे. आज अखेर दावामिळकतीमीध्ये प्रतिवादी क्र. १ आपले कुटुंब व प्रतिवादी क्र. ८ हीचे समवेत राहत असून प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ८ हीस कधीही दावामिळकतीबाहेर काढलेले नाही. अगर प्रतिवादी क्र. ४ यांचे ताब्यात देखील दिलेले नाही." हा सर्व मजकूर धादांत खोटा व चुकीचा असून तो मला मान्य नाही.

Civil Cour

दि. दि. मु. नं. २०/२०१३ दि. ५६ ...

१६) प्रतिवादी क्र. १ ने त्याचे कैफियतीमध्ये परिच्छेद १० मध्ये दिलेला मजकूर *"दावामिळकतीचे रजिस्टर खेरीदखत करुन घेण्याची जबाबदारी कधीही वादी व उर्वरीत प्रतिवादी यांनी एकमताने प्रतिवादी क्र. १ यांचेकडे दिलेली नव्हती. सदरचे खरेदीखत हे कै.सहदेव यांनी सदर दावामिळकतीचे विकासक श्री.विवेक नलावडे यांचे मदतीने पूर्ण करुन घेतलेले आहे. कै.सहदेव यांनी चांगल्या मानसिक व शारिरीक स्थितीत त्यांचे इच्छेनुसार दावामिळकतीचे खरेदीखत पूर्ण करुन घेतले असून सदर वेळी त्या मिळकतीचे विकासक श्री.विवेक नलावडे रा. देवगड हे देखील हजर होते. प्रतिवादी क्र. १ याने दावामिळकत लाटण्याचा प्रयत्न कधीही केला नसून कै.सहदेव यांनी आपल्या चांगल्या शारिरीक व मानसिक स्थितीत दावामिळकतीबाबत रजिस्टर लेख करुन ठेवला असून प्रतिवादी क्र. १ याने कै.सहदेव यांची कोणतीही फसवणूक करुन कोणताही लेख करुन घेतलेला नाही. वस्तुत: कै.सहदेव यांना प्रतिवादी क्र. १ व ८ सोडून त्यांचे इतर मुलांमध्ये असलेली मिळकत बळकावण्याची प्रवृत्ती माहिती होती त्याकारणाने व त्यांचे मृत्यू पश्चात प्रतिवादी क्र. ८ ची वादी व इतर प्रतिवादी हेळसांड करतील हे माहित होते. प्रतिवादी क्र. ८ ही मतिमंद असल्याने तिचा सांभाळ वादी व इतर प्रतिवादी करणार नाहीत याची पुरेपूर खात्री कै.सहदेव यांना होती. त्यामुळेच कै.सहदेव यांनी मृत्यूपत्र करुन सदरचा मृत्यूपत्र लेख त्यांचे जवळचे संबंधीत श्री.विवेक नलावडे यांचेजवळ देवून ठेवला होता. त्याचप्रमाणे सदर लेख करीत असल्याबद्दलची संपूर्ण माहिती कै.सहदेव यांनी श्री.विवेक नलावडे यांना दिलेली होती. तसेच श्री.विवेक नलावडे हे मृत्यूपत्र करतेवेळी सबरजिस्टार कार्यालय देवगड येथे हजर होते. त्यामुळेच कै.सहदेव यांनी केलेल्या मृत्यूपत्रानुसार प्रतिवादी क्र. १ हे दावामिळकतीचे मालक झालेले आहेत. त्यामुळे वादी व इतर प्रतिवादी यांचे हक्कसंबंध डावलण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तरी आजअखेर ग्रामपंचायत दफ्तरी प्रतिवादी क्र. १ यांचे नाव मालक म्हणून नोंद आहे. सदरची कारवाई ही कै.सहदेव यांनी केलेल्या मृत्यूपत्रामुळे झालेली आहे. त्यामुळे सदर बाबीची कल्पना प्रतिवादी क्र. १ ते ८ यांना देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. प्रतिवादी क्र. ८ ही आजही प्रतिवादी क्र. १ यांचेसोबत दावामिळकतीत राहत असून तिला दावामिळकतीतून बाहेर काढले व तिला गाव मौजे वाडा येथे आणून वादी व प्रतिवादी क्र. ४ यांच्या ताब्यात दिले."* हा सर्व मजकूर धादांत खोटा व चुकीचा असून तो मला मान्य नाही.

परब

१७) प्रतिवादी क्र. १ ने त्याचे कैफियतीमध्ये परिच्छेद ११ मध्ये दिलेला मजकूर *"कै. सहदेव यांनी केलेल्या मृत्यूपत्रावर सहया व अंगठा हा त्यांचाच आहे. सदरचे मृत्यूपत्र करतेवेळी त्यांची शारिरीक व मानसिक स्थिती चांगली होती. प्रतिवादी क्र. १ याने त्यांची कोणतीही फसवणूक केलेली नाही व त्यांच्याकडून कोणताही मृत्यूपत्राचा लेख करुन घेतला नाही. सदरचा मृत्यूपत्राचा लेख कै. सहदेव यांनी स्वच्छेने केलेला आहे. दावामिळकत ही कै.सहदेव यांनी प्रतिवादी क्र. १ यांच्या नावे केलेली आहे. त्याचे कारण वर नमूद केलेप्रमाणे आहे. प्रतिवादी क्र. १ हा कै.सहदेव यांना त्यांच्या हयातीत सांभाळीत होता. त्यांचे अन्नपाणी, औषधे इ.प्रकारची तजवीज करत होता. तरी त्यामुळेच कै. सहदेव यांना वरीलप्रमाणे दावामिळकत प्रतिवादी क्र. १ यांना मृत्यूपत्राने दिली आहे."* हा सर्व मजकूर धादांत खोटा व चुकीचा असून तो मला मान्य नाही.

१८) प्रतिवादी क्र. १ ने त्याचे कैफियतीमध्ये परिच्छेद १२ मध्ये दिलेला मजकूर *"कै. सहदेव हे मुंबई येथे पोलीस खात्यात नोकरीला होते. कै.सहदेव यांनी आपल्या हयातीत गाव मौजे वाडा येथे असलेली मिळकत ही त्यांनी आपल्या पत्नीचे नावे खरेदी केली. सदरचे खरेदीखत जरी त्यांचे पत्नीचे नावे असले तरी सदरची मिळकत खरेदी करणेकरिता लागणारा सर्व पैसा कै.सहदेव यांनीच खर्च केलेला होता. सदरची मिळकत खरेदी केल्यानंतर कै.सहदेव यांनी सदरची मिळकत ही आंबा कलम लागवडीकरिता पांडुरंग गोगटे यांचेकडे काही वर्षाकरिता अटी व शर्थीवर देवून सदरची मिळकत ही विकसित करुन घेतली. त्याकरिता लागणारा खर्च हा कै.सहदेव यांनीच केला. आज अखेर सदरहू मिळकतीमध्ये ३०/३५ वर्षे वयाची सुमारे ५०० हापूस आंबा कलमे असून सदरहू कलमांचे उत्पन्न हे कै.सहदेव हेच घेत होते. त्याच उत्पन्नातून त्यांनी अन्य घरइमले खरेदी केले. दावामिळकत ही देखील कै.सहदेव यांनी त्यांच्या स्वउत्पन्नातून खरेदी केलेली मिळकत आहे. दावामिळकतीचे रजिस्टर साठेखत हे कै. सहदेव यांनी विवेक नलावडे यांचे समवेत केलेपासून विवेक नलावडे व कै.सहदेव यांचे चांगले ऋणानुबंध तयार झालेले होते. त्यामुळेच कै.सहदेव हे आपल्या*

Civil Co

दिवाणी मुकदमा २१/२०१३ नि.५६

*कुटुंबाच्या बऱ्याचशा बाबी, सुख–दुःखे हे विवेक नलावडे यांना सांगत असत. त्याचवेळी कै.सहदेव यांनी श्री. विवेक नलावडे यांना दावामिळकत ही मी माझा मुलगा महेंद्र यांचेकरिता खरेदी केलेली आहे व माझे मृत्यूपश्चात ती त्यास देणेची आहे. त्यामुळेच कै.सहदेव यांना आपल्या मृत्यूची चाहूल लागली त्यावेळी त्यांनी मृत्यूपत्राचा लेख साक्षीदारांसमक्ष पूर्ण केला."* हा सर्व मजकूर धादांत खोटा व चुकीचा असून तो मला मान्य नाही.

१९) प्रतिवादी क्र. १ ने त्याचे कैफियतीमध्ये परिच्छेद १३ मध्ये दिलेला मजकूर *"कै. सहदेव यांनी मृत्यूपत्रात प्रतिवादी क्र. ८ यांच्यासाठी काहीही तरतूद करुन ठेवलेली नाही, याबद्दल प्रतिवादी क्र. १ यांना नक्की सांगता येणार नाही. परंतु कै.सहदेव यांना आपल्या पश्चात प्रतिवादी क्र. १ हे प्रतिवादी क्र. ८ हिला सांभाळेल तसेच तिला गावातील कै.सहदेव यांच्या खरेदी केलेल्या तसेच विरार येथील फ्लॅट व वडीलोपार्जित मिळकतीत हिस्सा मिळवून देईल याची खात्री असल्याने त्यांनी प्रतिवादी क्र. ८ बद्दल आपल्या मृत्यूपत्रात तरतूद करुन ठेवलेली नसावी. सदरचे मृत्यूपत्र हे बरोबर असून त्यात कोणताही भेदभाव व फसवणूक अगर अन्याय झालेला नाही. कै.सहदेव हे प्रतिवादी क्र. १ यांच्या दबावाखाली नव्हते. तसेच ते मानसिकरित्या दुर्बल झालेले नव्हते. कै.सहदेव यांना पेन्शन चालू असल्याने ते प्रतिवादी क्र. १ यांचेवरही अवलंबून देखील नव्हते. प्रतिवादी क्र. १ याने कै.सहदेव यांचेवर कोणताही दबाव टाकून हे मृत्यूपत्र केलेले नाही. त्याबाबतच्या तक्रारी या खोटया व खोडसाळ आहेत. कै.सहदेव यांनी केलेले मृत्यूपत्र हे कायद्याचे पालन करुन केलेले आहे. त्याबाबत परिच्छेद क्र. ८ येथे केलेल्या तक्रारी बनावट आहेत. दावामिळकत ही कै.सहदेव यांनी स्वउत्पन्नातून खरेदी केलेली होती. त्यामुळे त्यांना मृत्यूपत्राने कोणालाही देण्याचा हक्क होता."* हा सर्व मजकूर धादांत खोटा व चुकीचा असून तो मला मान्य नाही.

५२ब २०) प्रतिवादी क्र. १ ने त्याचे कैफियतीमध्ये परिच्छेद १४ मध्ये दिलेला मजकूर *"दावामिळकत ही कै.सहदेव यांनी आपल्या वडीलोपार्जित मिळकतीतील त्यांच्या हिश्श्याच्या उत्पन्नातून खरेदी केलेली मिळकत असून सदरहू मिळकत ही त्यांनी आपल्या हयातीत प्रतिवादी क्र. १ यांचे कुटुंबाकरिता खरेदी केलेली होती व त्यामुळेच त्यांनी आपल्या हयातीत दि. १५/१०/२०११ च्या मृत्यूपत्राद्वारे प्रस्तूतची मिळकत ही प्रतिवादी क्र. १ यास मालकीहक्काने उपभोगण्यास दिलेली आहे. सदरचे मृत्यूपत्र करतेवेळी त्यांची मानसिक व शारिरीक स्थिती चांगली होती. तसेच ते कोणत्याही दबावाखाली नव्हते. कै.सहदेव यांनी मृत्यूपत्रात नमूद केलेप्रमाणे त्यांचे पालनपोषण, सांभाळ व त्यांच्या आजारपणाचा खर्च प्रतिवादी क्र. १ हेच करीत होते व त्यामुळेच त्यांनी स्वखुशीने व मर्जीने प्रतिवादी क्र. १ यांस मृत्यूपत्र लिहून दिलेले आहे. सदरचे मृत्यूपत्र हे खरे व योग्य असे आहे."* हा सर्व मजकूर धादांत खोटा व चुकीचा असून तो मला मान्य नाही.

२१) प्रतिवादी क्र. ४ ने दिलेल्या कैफियतीमधील सर्व मजकूर बरोबर आहे. त्यावरुन देखील माझा दावा निर्विवादरित्या शाबित होत आहे.

२२) प्रस्तूत दाव्यामध्ये मी दिनांक १५/१०/२०११ रोजीचे कै.सहदेव रावजी परब यांनी केलेले अस्सल रजिस्टर्ड खरेदीखत (दस्त क्रमांक १२५०/२०११) हजर केले आहे. सदरहू खरेदीखत देवगड दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणीकृत करण्यात आले असून त्यामधील सर्व मजकूर खरा व बरोबर आहे. तसेच सदरहू खरेदीखतावर खरेदी घेणार म्हणून माझ्या वडीलांची सही असून ती मी ओळखतो व ती बरोबर आहे. त्यातील सर्व मजकूर खरा व बरोबर आहे. सदरहू कागदाला निशाणी देण्यात येवून पुराव्याचे कामी वाचण्यात यावा. तसेच मी कै.सहदेव परब यांनी दिनांक १५/१०/२०११ रोजी केलेले दस्त क्रमांक १२५१/२०११ चे मृत्यूपत्राची झेरॉक्स प्रत हजर केली आहे.

Asstt.
Civil Court,

-१५-

२३) माझी नम्रतापूर्वक विनंती अशी की,

अ) दिनांक १५/१०/२०११ रोजी दुय्यम निबंधक देवगड यांचेकडे दस्त क्रमांक १२५१/२०११ या क्रमाकाने नोंदविण्यात आलेले माझे व प्रतिवादींचे वडील कै.सहदेव यांचे मृत्यूपत्र रद्द करणारा व सदरील मृत्यूपत्र मी व प्रतिवादी २ ते ८ यांचेवर बंधनकारक नसल्याचा ठराव करण्यात यावा.

ब) दावा मिळकतीचे माझेत व प्रतिवादीं दरम्यान वाटप करण्यात येवून त्यातील माझा व प्रतिवादी २ ते ८ यांचा ८/९ हिस्सा स्वतंत्र करण्यात येवून त्याचा पृथक कब्जा मला व प्रतिवादी २ ते ८ ला देववावा.

क) मी व प्रतिवादी २ ते ८ आमचेपैकी कोणालाही भविष्यात गरज भासल्यास वरील एकत्रातील ८/९ हिश्श्यांपैकी आपआपल्या भागाचे स्वतंत्र वाटप करुन घेण्याची मुभा असणारा विशेष आदेश याच दाव्याचे कामी करण्यात यावा.

ड) वरील वाटप करताना आवश्यकता भासल्यास पार्टीशन ॲक्टमधील तरतूदींचा वापर करण्याविषयी आदेश देणारा प्राथमिक हुकूमनामा करण्यात यावा.

वि.स. परब

इ) या दाव्याचा सर्व खर्च प्रतिवादी १ कडून मला देववावा.

प) न्यायाअंती आणखी योग्य व न्याय्य ती सर्व दाद देववावी.

**वर नमूद परिच्छेद क्रमांक १ ते २३ मधील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले सरतपासाचे शपथपत्र.**

**तारीख — १५/१०/२०१६**

**ओळख**

ॲडव्होकेट
(ओ.वी.दिक्षित)

विलास स.परब
( श्री. विलास सहदेव परब )
वादी

Solemnly affirmed before me
Shri. Vilas Sahadeo Parab.
who is identified before me
by Adv. Shri. O. V. Dixit
whom I personally know.
Date this day of 15th Oct. 2016
Asstt. Supdt.
Civil Court, Devgad

१६

वादीचा पुढील सरतपास शपथेवर सुरु

२७) मी विलास सहदेव परब, वय ५८-वर्षे धंदा-शेती रा. मौजे वाडा (परबवाडी), तहसिल-देवगड जिल्हा- सिंधुदुर्ग आज रोजी न्यायालयासमक्ष शपथेवर कथन करतो की उपरोक्त सरतपासातील सर्व मजकुर बरोबर असुन तो मला मान्य व कबुल आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे

सरतपास संपला

उलटतपास नहकुब

दिनांक :- १५/१०/२०१६

श्रवणोत्तर लिखित

दिवाणी न्यायाधीश

नियं.दिवाणी दावा क्र.२९/२०१३ नि.५६ लगत.

उलटतपास वादी यांचा प्रतिवादी नं.४ तर्फे विधीज्ञ श्री.राणे यांचेमार्फत शपथेवर सुरु

२५. आम्ही एकूण सहा भाऊ व तीन बहीणी आहोत. मी प्रस्तुतचा दावा ग्रामपंचायत घर क्रमांक ११८१ या सदनिकेबाबत दाखल केला आहे. सदरची सदनिका माझ्या वडीलांनी खरेदी घेतली आहे. माझ्या वडीलांचे नाव सहदेव रावजी परब असे होते. माझ्या वडीलांचा मृत्यू दि.२१/१०/२०११ इ. रोजी झाला. त्यांना रक्तदाब व मधुमेह चा आजार होता. त्यांच्या मृत्यूच्या ४ ते ५ दिवस आधीपासून म्हणजेच दि.१५/१०/२०११ पासून त्यांची प्रकृती चांगली नव्हती, त्यामुळे त्यांना डॉक्टर बोरफळकर यांच्याकडे ॲडमीट केले होते. तेव्हा पासून त्यांची शुध्द हरपली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या कालावधीमध्ये त्यांना काहीच समजत नव्हते.

२६. आमची वडीलोपार्जीत मिळकत वेगळी असुन ती वाडा येथे आहे. दावा मिळकतीशी वडीलोपार्जीत मिळकतीचा काहीही संबंध नाही. मी प्रस्तुतचा दावा वडीलोपार्जीत मिळकतीबाबत केला नाही. माझे वडीलांची मन:स्थिती व्यवस्थित नसलेल्या काळात प्रतिवादी क्र.१ याने त्याच्या फायदयाकरिता आम्हा सर्व भावंडांच्या अपरोक्ष माझ्या वडीलांच्या कडून मृत्यूपत्र बनवून घेतले. सदरचे मृत्यूपत्र खोटे आहे. आमची एक बहीण छाया सहदेव परब ही मतीमंद आहे. हे म्हणणे खरे आहे की,प्रतिवादी क्र.१ ने दिलेले म्हणणे खोटे आहे. माझी बहीण छाया हिला देखील या मृत्यूपत्रात काहीही दिले नाही. दावा मिळकतीमध्ये आम्हा सर्व भावंडांचे हक्क आहेत.

उलटतपास प्रतिवादी नं. ४ तर्फे पूर्ण.

उलटतपास प्रतिवादी नं.१ चे वकीलांचे तोंडी विनंतीवरुन पुढील तारीखपर्यंत राखून ठेवणेत येत आहे.

श्रवणोत्तर स्विकृत

6/7/17

दिवाणी न्यायाधीश क. स्तर
देवगड

दि. ०६/०७/२०१७